Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# महानुभव पंथाचे स्थलवर्णनातील वाड्मयीन वैशिष्ट्ये व भाषाशैली

**डॉ.राजीव आबाराव काळे**
मराठी विभाग
श्रीबंकटस्वामी महाविद्यालय, बीड

प्रत्येक लेखक, कवी हा मन: प्रवृत्तींने घडलेला असतो. त्याच्या आयुष्याचे स्वतंत्र परिणाम त्याच्या जीवनाला लागलेले असतात. त्यामुळे त्याची स्वतंत्र अशी शैली निर्माण झालेली असते. "शैली म्हणजे व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब" १ यावरून प्रत्येक लेखकाचे व कवीचे व्यक्तिमत्त्वाचे ठसे त्याच्या साहित्याच्या शैलीत उतरत असतात, तर संस्कृत साहित्यात शैली हा काव्याचा आत्मा मानलेला आहे. रीती आत्मा काव्यस्य ( वामन) शैली ही लेखकाच्या मनाची निदर्शक असते. त्यातूनच लेखकाच्या लेखन कौशल्याचे दर्शन घडते.

लेखकाचे विचार , विकार एकूणच त्याच्या साहित्यातून दिसते. याचप्रमाणे महानुभावीय पंथीय कवींनी आपल्या स्थल वर्णन ग्रंथाच्या माध्यमातून शैलीची ओळख करून दिली आहे."महानुभाव पंथाच्या पोथ्यांची एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात योजलेली सांकेतिक लिपी होय"२ सातीग्रंथांपैकी एक सह्याद्रीवर्णनकर्ता खळोबास याने सांकेतिक लिपीचा शोध लावला. महानुभाव पंथाच्या 'सकळ' म्हणजे सर्व अनुयायांनी तिचा स्वीकार केला. म्हणून या लिपीस 'सकळ' हे नाव पडले असावे.

प्रत्येक कवी, लेखक आपले भावानुभाव विविध प्रकारे व्यक्त करत असतो. भावानुभाव व्यक्त करण्यासाठीची शैली प्राप्त होण्यास त्या लेखकाला परिश्रमाची आणि विद्वत्तेची आवश्यकता असते. पंथीय कवींची कावीळ निर्मिती ही 'पंचकृष्ण' भक्तीतून निर्माण झालेली आहे. परमेश्वर चरित्र, गाणे हीच या काव्यांची प्रेरणा असून या स्थल वर्णन ग्रंथाचे स्वरूप ही अध्यात्मिक आहे. त्यांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**स्वतंत्र काव्य:**

महेश्वर पंडितकृत श्री ऋद्धिपुर महात्म्य हे महत्त्वपूर्ण काव्य आहे. महानुभव पंथीयांचे अनेक ग्रंथांप्रमाणे स्थल वर्णन ग्रंथ ही स्वतंत्र काव्यरचना आहे. महेश्वर पंडिताचे 'ऋद्धिपूर माहात्म्य ' हे कोणत्याही संस्कृत व प्राकृत ग्रंथाचा आधार घेऊन निर्माण झालेले नाही. हे काव्य

सर्वस्वी महेश्वर पंडिताच्या प्रतिभेतून स्फुटलेले आहे. ज्या मध्ययुगीन कालखंडात ते निर्माण झाले त्या कालखंडाचा विचार करता त्या काळातील ग्रंथरचना ही प्रामुख्याने आधारित स्वरूपाची होती.

**परंपरागत स्वरुपाचे काव्य -**

ज्या काळात महेश्वर पंडितांनी ऋद्धीपुर काव्य लिहिले त्या काळात मराठी भाषेतील काव्य निर्मितीचे चांगले बाळसे धरले होते. एकाव्यपरंपरेतच बसणारे आहे. ग्रंथाच्या सुरुवातीचे मंगलस्वने, वर्णने, अलंकार आधी सर्व गोष्टी परंपरेला धरून आहेत. प्रारंभी कवीने श्रीचक्रधरांना नमन त्यानंतर श्री नागदेवाचार्य संत महंत आणि नंतर मग श्रोत्यांनाही नमन केलेले आहे. आणखी एक पारंपारिक स्वरूपाचा भाग म्हणजे कवीने केलेली आत्मनिंदा. उदा.

मी अनाधिकरी बहुतुं:
देवी झाडीला हातू:
जें म्हणितले सृष्टी आंतु:
न करीची देवाचे ||८||
तरी तुम्ही कृपेचा सागर:
आणि मी तिला पावला भूतला थोर
तरी कां नेदा अमचे करू;
कां न म्हणा ना मी ||३०||
(ऋद्धीपुर दर्शन सं.राजधर,पंतबाबा पृ.२८)

अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. त्याचप्रमाणे श्रोता आणि वक्ता यांच्यातील संवादाच्या माध्यमातून काव्य निर्मिती करणे हा देखील पारंपरिक स्वरूपाच्या लेखनाचा भाग म्हणावा लागेल.

ऐसा श्रोता वक्त्यांचा संवादु:
तो मी बोलैन समर्थवादु:
तो संती पहावा शब्द भेदू:
विचारूनी ||
( ऋद्धीपूरदर्शन सं.राजधर पृ.३४)

**पौराणिक कथांचा वापर :-**

'ऋद्धीपुरवर्णन' या काव्यप्रमाणेच महानुभव पंथातील अनेक स्थलवर्णनपर ग्रंथातून पौराणिक कथांचे ओघवते वर्णन दिसून येते. महेश्वर पंडित यांच्या ऋद्धिपुर माहात्म्य या काव्यातही निवेदनाच्या ओघात कवीने ऋद्धीपूर नगरीचे माहात्म्य वाढविणाऱ्या पौराणिक कथांचे निवेदन केलेले आहे. तीर्थक्षेत्रांच्या महत्त्वासाठी या पौराणिक कथांचा कवी वापर करीत होते. तिसऱ्या अध्ययात महेश्वर पंडितांनी भागवताच्या एकादश व प्रथम स्कंदाच्या आधारे श्रीनागार्जुन व लक्ष्मीद्रभटांन विस्मय होतो. त्यानंतर त्यांनी ज्ञानमार्गाबाबत विचारणा केली तेव्हा भागवताच्या एकादशस्कंधामध्ये श्रीकृष्णांनी उद्धवाला जे ज्ञानरूपण केले. श्रीनागदेवचार्यांनी लक्ष्मीद्रभटांनी थोडक्यात निरूपण केले. या अनुषंगाने अवधूत महात्म्याने यदुरायाला जे ज्ञान दिले त्याची माहिती ती-

देऊ व्यापकू सचराचरा:
किवी गणना अपरांपरा:
आणि असंख्यात अवतारा:
माप कैसे |९७||
तरी अवतारा आणि निर्वेवा
भिन्नत्वें विचारूनी पहावा:
माया वेषें नटन केले जीवा:
उद्धरावेया || १०२||
( ऋद्धीपूरदर्शन सं.पंतबाबा,आराध्ये पृ.२२)

**प्रसंगवर्णने :-**

प्रसंग वर्णन हे कवीच्या वर्णन शैलीचे एक महत्त्वाचे अंग आहे. ऋद्धीपुर महात्मे वर्णन करीत असताना आलेली पौराणिक आख्याने व या आख्यानातून आलेले विविध प्रकारचे प्रसंग चित्रित करण्यात आले आहेत. प्रस्तुत काव्यातील श्रीकृष्ण जन्माचा प्रसंग उल्लेखनीय आहे. कंसाने देवकीच्या सहा गर्भाचा वध केल्यानंतर सातवा बळीराम आणि आठवा श्रीकृष्ण शंख, चक्र गदा, पद्म सुनील पितांबर अशा सर्व शक्तीने युक्त श्रीकृष्णाने माध्यान वेळी अवतार धारण केला.

त्यांच्या चतुर्भुज अवतारामुळे 'तेजोमय कोटी सूर्यप्रकाशु जाला. त्या प्रकाशाने दिपून जाऊन वसुदेव देवकीने श्रीकृष्णाला विनवणी केली -

जी जी दोन्ही भुजा अच्छादनें:

विनंती स्वीकारावी जीजगजीवनें:

ऐसें हें अवतरणे

सामायेना || ३६१||

( ऋद्धीपूरदर्शन सं. पंतबाबा पृ. ११८)

**करूणरस:-**

महानुभाव पंथीय यांच्या स्थलवर्णनपर ग्रंथातून करूणरस चा आविष्कार जाणवतो.महेश्वर पंडित यांच्या ' ऋद्धीपूर माहात्म्य' या ग्रंथातून करूणरस हा प्रामुख्याने जाणवतो.प्रस्तुत काही प्रसंगातून करुणरसाचे दर्शन घडते.कौशिका वयाने लहान असताना देखील वयाने मोठा असलेला ऋचिक ऋषी तिला मागणी घालतो.तेव्हा गाधी राजा विचारात पडतो.वयाने लहान असलेली कौशिका ऋचिकाला द्यायची कशी ?. आणि देत नाही तर ऋचिक तापसी आहे.गाधी राजाच्या द्विदल अवस्थेचे हे करूणरस निर्माण करणारे वर्णन

महंतू बहुता काळाचा :आणि कौशिके जन्म सांपेचा:

सुकुमार कैसीयापरी नाचा आणा म्हणिजे ||१६९||

( ऋद्धीपूरदर्शन सं.राजधर पृ.६४)

श्रीकृष्ण यमुनेच्या पाण्यात बुडाला ही वार्ता पसरली तेव्हा

यशोदा हृदयें पीडित | महाळापी अक्रंदत |

मनी कोठे बुडाला कृष्णनाथ| ते ठावो दावा मज ||६६०||

(ऋद्धीपूर माहात्म्य सं. पठाण यू.म.पृ.१५५)

महानुभव स्थळवर्णन ग्रंथ अभ्यास करताना त्यांची वाङ्मयीन महत्त्व लक्षात घेणे महत्त्वपूर्ण वाटते. पंथीय स्थळवर्णने ही वाङ्मयीन गुणविशेषत्वाने स्थळवर्णने वर्णनीत केली आहेत. त्यातूनच कवीचे लेखन शैलीचे विविध पैलू पहावयास मिळतात. पंथीय कवीच्या लेखन शैलीला अध्यात्मिकतेचे अधिष्ठान आहे.

जनसामान्यांना उमज व्हावी म्हणून अनेक पौराणिक कथांचा वापरही त्यांनी केला आहे. निवेदन शैली वापरून स्थल वर्णने लेखन केली आहेत. स्थल वर्णनातील अनेक पात्रांचे, व्यक्तींचे

स्वभाव विशेष लेखनातून उत्कटपणे मांडली आहेत. प्रसंग वर्णनातून प्रत्यक्ष दृश्य वाचकांच्या समोर उभे राहावे. अशीच प्रसंग वर्णने केली आहेत. वेगवेगळ्या भक्ती, वीर ,करूण, शांत रस आदीं रसाविष्कारांनी नटलेली स्थळ वर्णने ही तेवढ्याच अलंकार सौंदर्याने नटलेली दिसतात. कल्पनाविलासाच्या माध्यमातून वेगवेगळी कवी कल्पना यातून मांडली आहे. सर्वगुण विशेषासह भक्ती व तत्त्वज्ञान यांची जोड शब्दात कायम ठेवली आहे.

**संदर्भ -** १) कुलकर्णी अ.वा. साहित्य विचार ,पृ.क्र.९८
२) तुळपुळे शं.गो. महानुभाव पंथ आणि त्यांचे वाड्मय पृ.क्र. ६३